**विषय:- सन २०२२-२०२३ च्या मुळ अंदाजपत्रकात नगरोत्थान अंतर्गत १०० एम.एल.डी. पाणी पुरवठा योजना मनपा हिस्सा या लेखाशिर्षका ऐवजी अमृत २.० अभियांना अंतर्गत १०० एम.एल.डी. पाणी पुरवठा योजना मनपा हिस्सा या लेखाशिर्ष नव्याने तयार करणे व जुन्या लेखाशिर्षमध्ये शिल्लक तरतुद नवीन लेखाशिर्षमध्ये पुर्नविनियोजन करणेबाबत मंजुरी मिळणेबाबत.**

शासन निर्णय क्रमांक संकीर्ण -२०२२/(३४३/१२) सिं.व्य(धोरण) मंत्रालय, मुंबई ४०००३२ दि. १६/०२/२०१३ च्या शासन निर्णया नुसार भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेस जलसिंचन विभागाकडून १०० एम.एल.डी. (३१.३५४ दललि) पाणी पुरवठा मंजुर झालेला आहे. भिवंडी निजामपुर श्हार महानगरपालिकेने १०० एम.एल.डी. वाढीव पाणी पुरवठा योजना तयार करणे या प्रक्लपाचे नियोजन, कार्यान्वय, पर्यवेक्षण व प्रकल्प यंत्रणा म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना प्रकल्प सल्लगार म्हणून नेमण्यास मा. महासभा ठराव क्र. २४७ दिनांक १६/०३/२०१७ अन्वये मान्यता दिलेली आहे. दरम्यानंच्या कालावधीमध्ये भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा सन २०१६-२०१७ च्या अमृत अराखडयात अमृत मिशन १.० अंतर्गत समावेश होऊन महानगरपालिकेचा १०० एम.एल.डी. वाढीव पाणी पुरवठा योजनेचा समावेश हा अमृत मिशन १.० अंतर्गत करण्यांत आलेला होता. सदर प्रकल्पाचे प्रकल्प सल्लागार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेसाठी १०० द.ल.लि. प्रति दिन वाढीव पाणी पुरवठा योजना तयार करुन प्रथम टप्यात स्थापत्य कामाचा २०५.५२ कोटी रक्कमेचा प्रकल्प अहवाल तयार करुन मान्यतेसाठी शासनास सादर करण्यांत आला होता. त्यास नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्रमांक अमृत-२०१७/प्र.क्र./२७/नवि.३३ मंत्रालय, मुंबई-३२ दिनांक ८ फेब्रुवारी २०१७ नुसार प्रशासकीय मान्यता देणेंत आलेली होती.

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने अमृत १.० अभियान योजने अंतर्गत १०० एम.एल.डी. वाढीव पाणी पुरवठा योजना तयार करुन योजनेचा मनपा व शासन स्तरावर १० वेळा निविदा मागविण्यांत आल्या होत्या परंतु सदर निविदांना प्रतिसाद न मिळाल्याने व दरम्यानच्या कालावधीत अमृत मिशन १.० ची मुदत संपल्याने सदर योजना सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेतंर्गत सादर करणे कामी शासन निर्देश होते. त्याप्रमाणे योजना सुधारीत करणेकामी मजीप्रच्या स्तरावर काम कार्यवाही सुरु होती. मजीप्रने त्यासाठी रु. ४०७.०० कोटी मात्र रक्कमेचे ठोबळ अंदाजपत्रक तयार करुन सदरचा सुधारीत प्रकल्प प्रस्ताव मुख्य अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडे तांत्रिक मान्यतेसाठी सादर केला होता. सदर प्रकल्प प्रस्ताव रक्कम रु. ४०७.०० कोटीच्या ठोबळ अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यात घेणेकामी मनपाकडून या पुर्वी मजीप्रास रु.२,०२,५७५.५५/- मात्र तांत्रिक मान्यता शुल्क अदा करण्यांत आलेले आहे.

दरम्यानच्या कालावधीत १०० एम.एल.डी. पाणी पुरवठा योजनेचा प्रस्ताव नगरोत्थान योजने ऐवजी अमृत २.० अभियांतर्गत सादर करण्यांचे शासन निर्देश झाल्याने भिवंडी मनपाने नगरोत्थान योजने ऐवजी सदर योजनेचा प्रस्ताव अमृत २.० अभियानातर्गत शासनाच्या पोर्टरवर

सादर केलेला आहे. मात्र दरम्यानच्या कालावधीमध्ये जीएसटी चे दर हे १२ टक्के ऐवजी १८ टक्के झाल्याने योजनेच्या सुधारीत प्रकल्प अहवालात देखील १८ टक्के जीएसटीचा समावेश करुन १०० एम.एल.डी. वाढीव पाणी पुरवठा योजनेच्या प्रकल्प अहवालात देखील सुधारणा करणे क्रम प्राप्त होते. त्याप्रमाणे सदर योजनेचे प्रकल्प तांत्रिक सल्लागार यांनी सदर योजनेचे रु.४३५.२३ कोटी रक्कमेचे सुधारीत ढोबळ अंदाजपत्रक तयार करुन मुख्य अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडे तांत्रिक मान्यता घेणेकामी प्रस्ताव सादर केलेला आहे. मुख्य अभियता मजीप्रा यांच्या कार्यालयामार्फत रु. ४३५.२३ कोटी रक्कमेच्या सुधारीत ढोबळ रक्कमेच्या प्रस्तावास तांत्रिक मान्यता देणेची कार्यवाही पुर्ण झालेली आहे. त्यामुळे मजीप्रा मार्फत उर्वरित तांत्रिक शुल्क फी रु. २,३२,५३,१११.४५/- मात्र मजीप्रास अदा करणे कामी मागणी झालेली आहे. सदर रक्कम अदा केल्या शिवाय तांत्रिक मान्यतेचा अहवाल प्राप्त होणार नाही. त्यामुळे सदरचे शुल्क मजीप्रास अदा करणे आवश्यक आहे. सदर कामी प्रस्तावास मान्यता घेण्यात आलेली आहे.

भिवंडी मनपाच्या सन २०२२-२०२३ च्या मुळ अर्थसंकल्पात पान क्र.६० वर भाग-४ भांडवली खर्च/मत्ता अ.क्र. अ-१/४ या प्रमाणे नगरोत्थान अंतर्गत १०० एम.एल.डी. वाढीव पाणी पुरवठा योजना मनपा हिस्सा असे लेखाशिर्ष तयार करुन त्यात रु. १५.०० कोटीची तरतुद करण्यांत आली होती. मात्र सद्या मनपाची १०० एम.एल.डी. वाढीव पाणी पुरवठा योजना शासनाने अमृत २.० अभियानातंर्गत समाविष्ट केल्याने सदर सुधारीत पाणी पुरवठा योजना अमृत २.० अभियानांतर्गत सादर करण्यांचे निर्देश आहेत. त्याकामी मुख्य अभियंता मजीप्राच्या स्तरावर प्रकल्प अहवालाचे तांत्रिक मंजुरीची कार्यवाही सुरु आहे. सदर योजनेच्या तांत्रिक मान्यता शुल्का पोटी मजीप्रास रु.२.३२,५३,१११.४५/- मात्रचे शुल्क अदा करावयाचे असल्याने अमृत २.० अभियांनातर्गत सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पात अमृत २.० अभियानाच्या लेखाशिर्षाचा समावेश नाही. मजीप्राला तांत्रिक शुल्क अदा करण्यांकामी मनपाच्या सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पात सुधारणा करुन पान क्र.६० वर भाग-४ भांडवली खर्च/मत्ता अ.क्र. अ-१/४ नगरोत्थान अंतर्गत १०० एम.एल.डी. पाणी पुरवठा योजना मनपा हिस्सा या लेखाशिर्ष ऐवजी सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पात भांडवली खर्च १) अमृत २.० अभियाना अंतर्गत १०० एम.एल.डी. पाणी पुरवठा योजना मनपा हिस्सा, २) अमृत २.० अभियाना अंतर्गत १०० एम.एल.डी. पाणी पुरवठा योजना शासन हिस्सा, या लेखाशिर्ष नव्याने तयार करणे व जुन्या लेखाशिर्षमध्ये शिल्लक तरतुद नवीन लेखाशिर्षमध्ये पुनर्विनियोजन करणे आवश्यक आहे. तसेच सदर लेखाशिर्ष सुधारीत करुन सुधारीत लेखाशिर्षातुन मजीप्राला अदा करावयाची १०० एम.एल.डी. वाढीव पाणी पुरवठा योजनेच्या तांत्रिक मंजुरीचे शुल्क रु. २,३२,५३,१११.४५ /- अदा करण्याकामी मान्यता मिळणे आवश्यक आहे.

शासन परिपत्रक क्रमांक अमृत-२०२२/प्र.क्र.२०३/नवि-३३ दि. १६ सप्टेंबर २०२२ च्या परिपत्रकानुसार मुद्दा क्र.२ मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थानी अमृत २.० अभियानातंर्गत मंजूर प्रकल्पासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून तातडीने तांत्रिक मान्यता घेणे करीता प्रकल्प किंमतीच्या १ टक्के शुल्क महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे अदा करावे व सदर १ टक्के शुल्काच्या रक्कमेचा प्रकल्प किंमतीमध्ये समावेश करावा असे नमुद केलेले आहे.

सदर पाणी पुरवठा योजनेची ढोबळ किंमत रु. ४३५,२३,६८,७२३/- इतकी झाली असून त्यानुसार तांत्रिक मंजूरी शुल्क १ टक्के प्रमाणे रु.४,३५,२३,६८७/- इतकी होत आहे. मनपाने यापुर्वी म.जी.प्रा.ला रु. २,०२,७०,५७५.५५/- इतकी तांत्रिक शुल्क म्हणून रक्कम अदा केलेली आहे. उर्वरित रु. २,३२,५३,१११.४५/- इतकी तांत्रिक शुल्क अदा करावी लागणार आहे.

नगरोत्थान योजना अंतर्गत मनपाच्या सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पात १०० एम.एल.डी. पाणी पुरवठा योजना या लेखाशिर्षात रु. १५.०० कोटी तरतुद करण्यांत आलेली आहे. या तरतुदीमधुन रु. १,०२,७०,५७५.५५/- मात्र खर्च झालेला आहे. उर्वरित रक्कम रु. १३,९७,२९,४२४.४५/- मात्र तरतुद शिल्लक आहे. सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पात भांडवली खर्च १) अमृत २.० अभियाना अंतर्गत १०० एम.एल.डी. पाणी पुरवठा योजना मनपा हिस्सा, २) अमृत २.० अभियाना अंतर्गत १०० एम.एल.डी. पाणी पुरवठा योजना शासन हिस्सा, या लेखाशिर्ष नव्याने तयार करणे व जुन्या लेखाशिर्षमध्ये शिल्लक तरतुद नवीन लेखाशिर्षमध्ये पुर्नविनियोजन करणे आवश्यक आहे.

**प्रशासकीय ठराव क्रमांक :** 33 **दिनांक:** 03 / 10 **/२०२२**

सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पात भांडवली खर्च १) अमृत २.० अभियाना अंतर्गत १०० एम.एल.डी. पाणी पुरवठा योजना मनपा हिस्सा, २) अमृत २.० अभियाना अंतर्गत १०० एम.एल.डी. पाणी पुरवठा योजना शासन हिस्सा, या लेखाशिर्ष नव्याने तयार करणे व जुन्या लेखाशिर्षमध्ये शिल्लक तरतुद नवीन लेखाशिर्षमध्ये पुर्नविनियोजन करण्यांस महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२) नवि-१४, दि.०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विजयकुमार म्हसाळ, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, भिवंडी मंजुरी देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि.शहर महानगरपालिका, भिवंडी.**

नमुना क्र.१०

नियम ३० (३) पहा

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी.

दिनांक / /२०२२ च्या सभेत सादर केलेले पुर्नविनियोजनाचे विवरणपत्र

| या लेखाशिर्षातुन | | | | | | या लेखाशिर्षाकरीता | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | प्रधान, गौण व तपशिलवार | पाणी पुरवठा विषयक सेवा व इतर | मुळ अनुदान पर्यंत खर्च | आज तारखे पर्यंत खर्च | उपलब्ध शिल्लक | प्रधान, गौण व तपशिलवार | पाणी पुरवठा विषयक सेवा व इतर | मुळ अनुदान पर्यंत खर्च | आज तारखे पर्यंत खर्च | प्रस्तावित वाढीची रक्कम खर्च | अभिप्राय |
| १ | भांडवली खर्च/मत्ता भाग-४ | अ-१/४ नगरोत्थान योजने अंतर्गत १०० एम.एल.डी. पाणी पुरवठा योजना मनपा हिस्सा. | रु.१५०० लक्ष | सन २०२२-२३ रुपये १०२.७० लक्ष | सन २०२२-२३ करीता रु.१३९७.३० लक्ष | भांडवली खर्च | अमृत २.० अभियाना अंतर्गत १०० एम.एल.डी. पाणी पुरवठा योजना मनपा हिस्सा, नविन लेखाशिर्ष उघडणे. | - | - | रु.१३९७.३०लक्ष | सन २०२२-२३ मध्ये या योजनेकरीता लेखाशिर्ष नसल्यामुळे नवीन लेखाशिर्ष उघडणे आवश्यक आहे. |
| २ | बी-१-३ | नगरोत्थान योजने अंतर्गत १०० एम.एल.डी. पाणी पुरवठा योजना शासन हिस्सा. | रु.४९०० लक्ष | - | रु.४००० लक्ष | भांडवली खर्च | अमृत २.० अभियाना अंतर्गत १०० एम.एल.डी. पाणी पुरवठा योजना शासन हिस्सा, नविन लेखाशिर्ष उघडणे. | - | - | रु.४००० लक्ष | सन २०२२-२३ मध्ये या योजनेकरीता लेखाशिर्ष नसल्यामुळे नवीन लेखाशिर्ष उघडणे आवश्यक आहे. |

कार्यकारी अभियंता
भिवंडी नि.शहर मनपा

मुख्य लेखा परिक्षक
भिवंडी नि.शहर मनपा

मुख्य लेखा व वित्त अधिकारी
भिवंडी नि.शहर मनपा

अति.आयुक्त
भिवंडी नि.शहर मनपा

प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी नि.शहर मनपा